संत श्रीगुलाबराव महाराजांच्या शिष्य पंचायतनातील प्रमुख

श्री बाबाजीमहाराज पंडित विरचित

।। पांडुरंगनाथ स्तवन ।।

ाउली समर्थ ।।

य कूटस्थायात्मने नमः ।

ज्ञानराजाय ते नमः ।।

शिवशक्तिस्वरूपिणीम ।

वन्दे ज्ञानेशनंदिनीम ।। ::

।। पांडुरंगनाथ स्तवन ।।

नमोनियालंदिपपादपद्मा । नमो तदुत्संगजप्रेमसद्मा ।

नमो पिनाकी शिवचंद्रमौळी । गजास्यमाता नमुं हेमबाळी ।।१।।

नमोचिदानंदवृत्त्यैकगम्या । तुरीयरूपाश्रितयोगिगम्या ।

नमो जगत्सर्गस्थित्यंतकर्ता । न ताप बोधांतक ज्ञाननाथा ।।२।।

भक्तार्तिहा माधव दीनबंधु । व्रजांगनामाधुर्यरससौख्यसिंधु ।।

नमोनि पंचायतानासी भावें । वदे स्वप्रेमासी हृदीं सुवावे ।।३।।

बहूत माझ्या जननी प्रितीचे । असा म्हणूनी मज प्रेम साचे ।।

मदीय माता नवपंचकासी । जणूं शिवाधिष्ठित पंचकाशी ।।४।।

हृदीं स्थापुनी पूजुनी प्रेमभावें । अहर्निश मी मागतो हेचि द्यावे ।।

कृपा पालवी झांकुनिया अनाथा । त्वरें भेटवा माय ज्ञानेशसूता ।।५।।

द्यावा अमोघ सकळीं वर जी दयाळा । राहो अखंड वदनीं गुरूनाममाळा ।।

चित्तीं सदा गुरूपदांबुज आठवावे । नेत्रीं सदा हरिरूपा हृदयीं सांठवावे ।।६।।

असावें मनीं सर्वदा ध्यान तुझें । न भासो कदा पारकी आणि माझे ।।

तुझें रुप तें आवडो नित्य डोळां । नको कामिनीच्या विषीं चित्त चाळा ।।७।।

सदा आयको कान हे त्वदगुणातें । कधीं नायको संतनिंदामळातें ।।

तुला अर्पिलेल्या फुलाच्या सुवावा । भुकेली असो सर्वदा माझी नासा ।।८।।

नको लागूं देऊं मला भूक तेव्हां । तुझें भुक्त शेषान्न नोहेचि जेव्हां ।।

जळो हस्त माझे जरी अन्यकर्मी । तुझ्या पूजनावांचूनि सत्तु धर्मी ।।९।।

तंव कृपे प्रभो सर्वही सुखी । मग मलाच कां टाकिले अकीं ।।

सकल श्री तुझ्या पाऊलीं वसे । ऐक निवारितां कष्ट कायसे ।।१०।।

सकलही व्रतें शोधिली मियां । सदगुरो तुझे चरण पाहया ।।

परि न कोणीहि दाविती मला । विमल त्या अशा स्वामि पाउला ।।११।।

करुनि साधनें त्रासलो अती । तंव कृपेविण वाव भासती ।

सदय होऊनि दाविसी मला । चरण, जाणुनि जीव वाचला ।।१२।।

विषयीं गोविता रक्षिलें तुवां । सकळ वारुनि दोष वैभवा ।।

जनपदीं तुला दोषही दिले । परि सख्या मला अंगिकारिलें ।।१३।।

समिप राहुनी निंद्यही बहू । करित शेष जे शकू ना लिहूं ।

तहिंच थापटी देऊनी मला । जरि निवारितां लाभ थोरला ।।१४।।

सहन सर्वही केली पातकें । अवधि पावतां त्यागिले निके ।

अनधिकारिया देऊनी करा । अचुक लोटिले दुःख सागरा ।।१५।।

सुपथही तुवां दाविला जरी । शिकवी बालका माय ज्यापरी ।।

वडिलबंधु जे बोधिती मला । मी जाणुनी अंगीकारिला ।।१६।।

तदनुसारी जी वृत्ति बाणली । पलट घेईना वारिता भली ।।

विषयवासना ढ ज्या मनीं । घृतहुतागिवत पेट घेऊनी ।।१७।।

करुनि पातका त्यागुनि तुझी । सुगतिदायिनी वाणी नाथ जी ।।

सुजनचि मनीं आवडे तुम्हां । समजलों प्रभो त्यागितां आम्हा ।।

माता जशी करितसे स्वसुतास बोध । स्नेहार्द्र अंतरीं वरि उगलाचि क्रोध ।।

पुत्रास ठाउक जरी मनिं क्रोध नाहीं । केवीं त्यजील असदाचरणास तोही ।।१९।।

शिक्षा स्वपुत्र मज मानुनि देवराया । देतां तरी जी घडते अपराध काह्या ।।

आज्ञाचि हो करितसा परि मानुनी या । झालेत दोष तारि कां मज बोल वायां ।।२०।।

तुम्हां तरी प्रभुवरा कवण्या मुखानें । दोषी म्हणूं बहुत सांगितले सुखानें ।।

जेव्हां तुम्हासि कळले उपदेश वाया । तेव्हांचि टाकुनि दिले मज नाथराया ।।२१।।

वियोग घडतां तरी सुपथगामि होईल हा ।। करोनि सुविचार सुवचदुग्ध पीईल हा ।।

अशा धरुनि वृत्तितें निजपदा तिरोधारिले । परंतु जननी मिया निजपथा शिरीं धारितें ।।२२।।

सुदुग्ध जरि पाजिलें तरी अही विषातें वमी । खलाही सुजनकृपा परिणमे जसी तेवि मी ।।

नितांत करूणार्पितामृतवचा मनीं नाणुनी । अघाचि करि सारिखा... ... ... ।।२३।।

क्षणभरि दुरि नोहे साखरेहूनि गोडी । नरतनु जिविताची जोडिली तेविं जोडी ।।

दिननिशिं मनीं भारी कामनेचा उबाळा । मजहुनि करूणा कां सांडीयेली दयाळा ।।२४।।

सतत विषयभोगीं चित्त आसक्त गात्रा ।। निमिषहि तव नामीं लाविले नाहीं वक्त्रा ।।

इतिविधिहि न देवा जाणिना कामव्याळा । मजहुनी करूणा कां सांडियेली दयाळा ।।२५।।

कुटिल कुमती जाणा सर्वही भाव खोटा । वरिवरि जनलाजें दावितो प्रेम मोठा ।।

मजसम सुत ताता काळिमाही कुळाला ।। मजहुनी करूणा कां सांडियेली दयाळा ।।२६।।

जरी शठ तंव पोटीं जन्मलो जी दयाळा । परि तुजविण माते कोण देईल थारा ।।

कठिण हृदय केलें सांडूनि स्तन्य चिंता । पतित शरण आलों तारी वा मारी आतां ।।२७।।

हर विधी हरि नाना देवता रूष्ट होता । सदय हृदय अंबे देसि त्या हस्त माथां ।।

परि तंव अपराधी त्या मला कोण त्राता । पतित शरण आलों तारी वा मारी आतां ।।२८।।

तुजविषीं लटिकाचि भाव माझा न खोटें । निजपद द्विजवर्यौ दिधलें काय खोटें ।।

न गणुनि मति पायीं ठाव द्यावा समर्थौ । पतित शरण आलों तारी वा मारी आतां ।।२९।।

वनीं द्रुपदनृपाच्या आत्मजें आठविले । निमिष न लगतांचि आपणा भेटवीले ।।

उशिर मजविषीं कां लागला मायबाई । झडकरि मजलागीं धांवुनी भेट देई ।।३०।।

निजजन भजनातें ऐकुनी देहभावा । विसरूनि प्रभु माझा नायकी कानि धांवा ।।

श्रुतिपरि तुजलागीं सांगतेऽनंतकर्णी । झडकरी मजलागीं भेट दे मायबहिणी ।।३१।।

निरखुनि प्रभु माझे दुष्कृताचे सपाटे । निजकर प्रभु केले कर्णरंध्रा कपाटे ।।

निजसुत मग कां गे तारिला ज्ञानबाळें ।। मजविषीं भृगुटीते देसि कां सांग पीळे ।।३२।।

निशिदिनीं भव चित्तीं चिंती ज्या पादकंजा । हरिपद सुख नाहीं घ्यावया मार्ग दूजा ।।

शुकमुनि कवि सारे वंदिती पादरेणू । निगमथकितवाणी तेथ मी काय वाणूं ।।३३।।

अतितर भवतापें तापलों मायबापा । त्वरित मजसि दावा नाथजी मार्ग सोपा ।।

न कळत मज कांही वाट ती तत्पदाची । नतजनहृततापा कां न ये कीव माझी ।।३४।।

न गणुनी तंव थोरी बल्गिजे लेंकरानें । परि मज कधि नाहीं थापटिलें करानें ।।
अगणित सखया त्वां साहिले दोष माझे । हृदय कठिण ताता कायिसेही न लाजे ।।३५।।
उघड मजपुढें हा लक्षुनी पापराशी । भिउनि हरिपणाला क्षीरसिंधू तयासी ।।
शिव धरि निज माथां पापहंत्री सुगंधा । शरण तव पदातें नाथजी पांडुरंगा ।।३६।।
तवचरणसरोजीं चित्त माझें बसावें । तव गुण प्रभु कानीं सर्वदा आयकावे ।।
तप रुपीं सुगुणा रे ष्टि ही नेहटावी । व्रजवररतिपात्रा वासना पूरवावी ।।३७।।
द्रुपदनृपतिबाळा चिंती ज्या संकटीं हो । करि वरकरिं धांवा देऊनि दीर्घ टाही ।।
मन पण दुरि सारा फेडितां भक्त पांगा ।। शरण तंव पदातें नाथ जी पांडुरंगा ।३८।।
पतित म्हणुनि नाथा योग्य नाहीं अव्हेरा । प्रभुपण तुज आलें कोठुनि निर्विकारा ।।
विख न तरि सुधतें मोल ये काय सांगा । शरण तव पदातें नाथ जी पांडुरंगा ।।३९।।
तव पद महिमा मी जाणतो देवराया । तरि मग भव आसे धांवतो कां वराया ।।
अचुक भवनदी या लाधलो त्वत्पदा या । शरण तव पदातें नाथजी पांडुरंगा ।।८०।।
विनवी तव पायीं एवढें चित्त द्यावे ।। न गणुनि मम दोषा पाऊला दाखवावे ।।
नखशिख अघव्यापी पापराशी असा गा । शरण तव पदातें नाथ जी पांडुरंगा ।।४१।।
असुरपतिसुतानें प्राथिर्ले जेधवां जी । लगबग बहु झाली सांडिला चित्तवाजी ।।
दशवदन वधोनी रक्षिले पादभृंगा । शरण तव पदातें नाथजी पांडुरंगा ।।४२।।
तळमळ बहु वाटे केधवां भेट देशी । परि जिवीं मज वाटे काळजी नित्य ऐसी ।।
क्षणही जरी बसोनि आठवीना तुम्हांला । म्हणु कवण मुखानें दाखवा पाऊलाला ।।४३।।
जंववरि पदिं नाहीं आर्पिले जीवभौवा । जंववरि विषयाच्या सोडिले नाहीं नांवा ।।
जंववरि तव नामीं रंगली नाहीं वाणी । म्हणु कवण मुखानें घ्या कडे ऊचलोनी ।।४४।।
जरि शमदमयोगें जिंकितो शत्रु साही । तरि मज तरण्याची राहती आस कांहीं ।।
दिननिशि युवतीचे चुंबनीं चित्त राजी । म्हणुनि कवण मुखानें दाखवा पाऊला जी ।।४५।।
जननि कुपित होतां बाळ सांगे पित्यातें । विषम समय येतां माय रक्षी तयातें ।।
जननिजनक तूंचि कोपतां कोण सांगा । शरण तंव पदातें नाथजी पांडुरंगा ।।४६।।
लगबग करूनीयां धांव आली कृपाळे । निजकरधृतचक्रें मारि हे वैरी पाळे ।।
सकलभुवनमध्यें गाजवी श्रौतकीर्ती । गजवर सुखी केला ठेवि तो हस्त माथीं ।।४७।।
श्रीसदगुरूचरणार्पणमस्त